**आदेश नि.क्र. ३० वर**

**१.** सदरचा अर्ज ऋणकोतर्फे वकील यांनी सदर प्रकरणामध्ये सुनावणी करण्याकरीता पुढील पेशी तारीख मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**२.** धनकोच्या वकीलांनी म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे.

**३.** ऋणको तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज सुनावणी करण्याकरीता पुढील पेशी तारीख मिळण्याकरीता दाखल केला आहे. ऋणको यांनी असे कथन केले की, सदर प्रकरण हे ऋणको यांच्या सुनावणी करीता मुकरर आहे. ऋणको यांच्या वकीलांचे डोळयाचे ऑपरेशन झाल्यामुळे ते आजरोजी विद्यमान न्यायालयासमक्ष उपस्थित राहून सुनावणी करण्यास असमर्थ आहे. करीता त्यांना पुढील तारीख आवश्यक आहे.

**४.** धनको तर्फे वकील यांनी केलेले कथन नाकारता येत नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये ऋणकोला संधी दिल्यास धनको यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. ऋणको यांनी त्यांच्या अर्जात दिलेले कारण लक्षात घेता आणि प्रकरणाचा निकाल हा गुणवत्तेवर लावण्याकरीता ऋणकोला संधी देणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नि.क्र. ३० हा मंजुर करण्यात येत आहे.

स्वा/–

(ए. एच.सैय्यद)
२रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
हिंगणघाट.

दि.१७.०१.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word to word as per original order.

(Hrishikesh Y. shinde)
Stenographer Grade-III,
Court of 2nd Jt. CJSD,
Hinganghat.